# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 24 January 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २४ जानेवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- सहकार चळवळ आणि विज्ञान यांची सांगड घातल्यास आजही कृषिक्षेत्र लाभदायक ठरेल – केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांना विश्वास
- राज्य मार्ग परिवहन महामंडळाची सुमारे १५ टक्के भाडेवाढ आजपासून लागू
- ए आय विद्यापीठ स्थापन करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरणार – माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांची माहिती
- बेटी बचाओ – बेटी पढाओ योजना दशकपूर्ती अभियानाअंतर्गत परभणी जिल्ह्यात महिला मेळावा

आणि

- शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधासाठी लातूर इथं शेतकऱ्यांचं आंदोलन

****

सहकार चळवळ आणि विज्ञान यांची सांगड घातल्यास आजही कृषिक्षेत्र लाभदायक ठरेल, असा विश्वास केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे. नाशिक जिल्ह्यातल्या मालेगाव तालुक्यात अजंग गावात आयोजित सहकार परिषदेत ते आज बोलत होते. सहकारिता ही आत्नमिर्भरतेची सगळ्यात सुंदर व्याख्या असल्याचं शहा यावेळी म्हणाले.

> ***आत्मनिर्भरता की अगर सबसे सुंदर व्याख्या कोई है तो सहकारीता है। सहकारीता के बगैर किसान आर्तनिर्भर नही बन सकता। उन्नत नही बन सकता। और समृद्ध भी नही बन सकता। इसलिये मोदीजी ने सहकार से समृद्धी का नारा दिया है।***

या कार्यक्रमाला केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गिरीश महाजन, चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. या परिषदेनंतर अमित शाह नाशिक मधल्या काही कार्यक्रमांना उपस्थित होते.

****

राज्य मार्ग परिवहन महामंडळ – एसटीनं आजपासून १४ पूर्णांक ९७ टक्के भाडेवाढ लागू केली आहे. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. येत्या एक फेब्रुवारी पासून रिक्षा आणि टॅक्सीच्या दरामध्ये देखील तीन रुपयांची वाढ होणार आहे. मात्र एस टी महामंडळाचे कर्मचारी जुन्या योजना आणि सवलतीवर कायम राहणार असून, महामंडळाला आजही कर्मचाऱ्यांची दोन हजार कोटी रुपयाची देणी द्यायची आहेत. यासाठी प्रवाशांनी सहकार्य करावं, असं सरनाईक यांनी म्हटलं आहे.

****

शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल – ई डब्ल्यू एस घटकातल्या विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यात EWS प्रमाणपत्र सादर केलं नसेल, तरी अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला एका वर्षासाठी विशेष बाब म्हणून हे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी ही माहिती दिली. जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ होणार आहे.

****

ए आय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता विद्यापीठ स्थापन करणारं महाराष्ट्र हे देशातलं पहिलं राज्य ठरणार असल्याचं, माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय शिक्षण दिवसाच्या औचित्यानं विद्यार्थ्यांना शुभेच्छा संदेश देताना त्यांनी आज याबद्दल पुनरुच्चार केला. कृत्रिम बुद्धीमत्ता विद्यापीठाची स्थापना, संकल्पना उच्च तथा तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या पुढाकाराने होत असून, या विद्यापीठातून तंत्रज्ञानाने परिपूर्ण विद्यार्थी घडतील आणि ही क्रांतीकारी उपलब्धी असेल असं शेलार यांनी सांगितलं.

****

एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस सरकारने दावोसमध्ये जाऊन महाराष्ट्रात आतापर्यंत आणलेली गुंतवणूक आणि त्यातून निर्माण झालेले रोजगार यावर एक श्वेतपत्रिका काढावी, असं आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना

पटोले यांनी दिलं आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत होते. राज्यात मोठी गुंतवणूक आली तर त्याचं स्वागतच केलं पाहिजे, मात्र केलेले करार आणि वस्तुस्थिती काय आहे हे जाणून घेण्याचा जनतेला अधिकार असल्याचं ते म्हणाले. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या स्वबळावर लढण्याच्या घोषणेचं आपण स्वागत करत असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहिर होतील त्यावेळी स्थानिक पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून काँग्रेस पक्ष आपला निर्णय घेईल, असंही पटोले यांनी यावेळी स्पष्ट केलं.

****

उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं सुरु असलेल्या महाकुंभमेळ्याचा आज १२ वा दिवस आहे. महाकुंभात आतापर्यंत १० कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं.

दरम्यान, महाकुंभमेळ्यात आजपासून तीन दिवसांच्या नयनरम्य ड्रोन शो ला सुरुवात होणार आहे. या विशेष ड्रोन शो मध्ये आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं सनातन धर्माची वैशिष्ट्यं, परंपरा आणि वारसा दाखवला जाणार आहे.

****

बेटी बचाओ – बेटी पढाओ योजना दशकपूर्ती अभियानाअंतर्गत परभणी जिल्हा परिषदेच्या महिला आणि बाल कल्याण विभागाच्या वतीने पूर्णा तालुक्यातल्या कातनेश्वर इथं आज महिला मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक कार्यक्रम, किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी विषयी जनजागृती आणि महिलांच्या आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आलं. याविषयी उपस्थित महिलांनी माहिती दिली.

> ***माझं नाव मनिषा अंबादास चापके. कात्नेश्वर येथील ग्राम पंचायत सदस्य आहे मी. आमच्या शाळेमध्ये भरपूर कार्यक्रम घेण्यात आले. त्यामध्ये बेटी बचाव बेटी पढाव या अभियानाअंतर्गत आम्हाला माहिती सांगण्यात आली. महिलांच्या आरोग्याविषयी, आर्थिक सक्षमीकरण याबाबत आम्हाला माहिती सांगण्यात आली.***
>
> ***माझं नाव शुभांगी अंकुश चापके. आज आम्हाला महिला सक्षमीकरण या विषयावर खूप चांगली माहिती देण्यात आली. मला सी एम जी पी याबद्दल माहिती नव्हती. मला खूप चांगल्या प्रकारची माहिती भेटली.***

***आणि मी कागदपत्रं तयार करत आहे. आणि याच्यावर मी माझा नवीन उद्योग सुरू करणार आहे.***

****

प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्लीतल्या कर्तव्य पथावर नियोजित सोहळ्यासाठी बीड जिल्ह्याच्या धारूर तालुक्यातल्या आवरगाव ग्रामपंचायतचे आदर्श सरपंच, अमोल सर्जेराव जगताप यांना आमंत्रित करण्यात आलं आहे. याबद्दल जगताप यांनी आनंद व्यक्त केला –

***आम्ही ग्रामीण भागामध्ये चांगलं उल्लेखनीय काम केलेलं आहे. ग्राम पंचायतचा मोठ्या प्रमाणात विकास केलेला आहे. वेगवेगळे पुरस्कार आम्ही ग्राम पंचायतच्या माध्यमातून प्राप्त केलेले आहेत. सर्व प्रकारच्या सुविधा आम्ही गावासाठी उभ्या केलेल्या आहेत. स्वच्छ, सुंदर व हरित गाव आम्ही निर्माण केलेलं आहे. हे सर्व काम पाहून आम्हाला भारत सरकारने आमंत्रित केलं, त्याचा खूप आनंद आहे.***

हिंगोली जिल्ह्यातल्या खानापूर चित्ताचे सरपंच राम जाधव यांनाही प्रजासत्ताक दिन सोहळ्यासाठी आमंत्रित केलं आहे. त्यांनी आपली प्रतिक्रिया या शब्दात दिली.

***मला भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे होणाऱ्या लाल किल्ला येथील समारंभासाठी विशेष अतिथी म्हणून माझी निवड झालेली आहे. या सन्मानासाठी मी भारत सरकार यांचा खूप खूप आभारी आहे.***

नांदेड जिल्ह्याच्या लोहा तालुक्यातल्या सायाळ इथले प्रगतीशील आणि सेंद्रिय शेतीचा प्रचार आणि प्रसार करणारे शेतकरी रत्नाकर ढगे हे देखील प्रजासत्ताक दिन सोहळ्यात सहभागी होण्यासाठी आज दिल्लीला रवाना झाले.

****

शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधासाठी आज लातूरच्या तहसील कार्यालयापुढे शक्तीपीठ महामार्ग विरोधी कृती समितीच्या वतीनं आज एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आलं. प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग शेतकरी विरोधी असून यामुळे लातूर जिल्ह्यातली ५०० हेक्टर हून अधिक बागायती शेती बाधित होणार

असून, शेकडो शेतकरी शेतीहीन होणार आहेत. त्यामुळे या महामार्गाला कायम विरोध राहणार असल्याचं शेतकऱ्यांनी सांगितलं. सरकारने हा महामार्ग रद्द न केल्यास भविष्यात यापेक्षा ही तीव्र आंदोलन उभारणार असल्याचा इशारा शेतकऱ्यांनी यावेळी दिला.

****

सोयाबीन हमीभाव खरेदीला १५ दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी भारतीय किसान संघाच्या धाराशिव शाखेच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवलं आहे.

****

राज्य शासनाच्या वतीने रस्ता सुरक्षा माह राबवण्यात येत आहे. या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दीलिप स्वामी यांनी नागरीकांना काळजीपूर्वक वाहन चालवण्याचं आवाहन केलं आहे.

> ***रस्त्यावर वाहन चालवताना पूर्ण खबरदारी आपण सर्वांनी घ्यावी. वाहनांची नियमित तपासणी करावी. त्याचबरोबर कोणतंही नशापान करून वाहन चालवू नये. त्याचबरोबर शाळा, महाविद्यालयांचे जे वाहन आहेत, त्या वाहनांची सुद्धा नियमित तपासणी करावी. त्या गाडीवर असलेले जे वाहनचालक आहेत, त्यांच्यासुद्धा आरोग्य तपासणीचा कार्यक्रम संस्थांनी घ्यावा. धन्यवाद.***

****

नांदेड इथं राष्ट्रीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेचा आज समारोप झाला. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या मुलींच्या संघाने सुवर्ण पदक पटकावलं असून, मुलांच्या संघाने रौप्य पदक जिंकलं. क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र बुद्धिबळ असोसिएशन यांच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात आली.

****

भंडारा इथल्या आयुध निर्माण कंपनीमध्ये भीषण स्फोट होऊन पाच जणांचा मृत्यू झाला, तर सहा जखमी झाले. कंपनीमध्ये काम सुरू असताना आज सकाळी हा स्फोट झाला. ज्या ठिकाणी आज स्फोट झाला ती इमारत संपूर्णतः जमीन दोस्त झाली असून जेसीबीच्या साह्याने इमारतीच्या मलब्याखाली दबलेल्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू आहेत.

****